चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१२ जुन, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# अवघ्या काही तासातच जबरी चोरीचा गुन्हा उघड चंद्रपुर शहर पोलीसांची कार्यवाही

दिनांक १४/०६/२०१९ रोजी फिर्यादी नामे प्रदिप नोहरलाल पटले वय २२ वर्ष, रा. इंदीरा नगर नागमंदीर चौक चंद्रपुर यांनी पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे रिपोर्ट दिली की, ते आपले कॅटरींग सर्विस चे काम आटपवुन रात्रो १:०० वाजता दरम्यान घरी जात असतांना चंद्रपुर ते बल्लारशाह रोड बेनार रेल्वे स्टेशन जवळील डंपींग यार्ड जवळ काही लोकांनी त्यांना अडवुन चाकुचा धाक दाखववुन त्यांचे जवळील नगदी रोख आणि मोबाईल इत्यादी माल चोरून नेला. अशा रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे ४८०/२०१९ कलम ३९५, ३९७ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा नोंद होताच फिर्यादीने सांगीतल्या प्रमाणे वर्णनाच्या आरोपींचा शोध घेण्यास सुरूवात झाली. फिर्यादीने सांगीतल्याप्रमाणे त्यांचेव्यतीरिक्त त्याठिकाणी काही वेळापुर्वी आणखी तीन इसमांचे सोने चांदीचे दागीने, रोख, आणि मोबाईल फोन अज्ञात इसमाने जवबरीने चोरी केले आणि त्यांना मारहाण सुध्दा केली होती. या माहितीवरून पोलीसांनी आरोपींचा शोध घेण्यास सुरूवात केली. मिळालेल्या वर्णनाच्या माहितीवरून पोलीस पथक शोध घेतांना त्यांना अष्टभुजा वार्ड येथे एक आरोपी नामे **१)सुमित चंद्रशेखर मेश्राम वय २०. रा. अष्टभुजा वार्ड चंद्रपुर,** मिळुन आला. त्यास अटक करून सदर आरोपीची विचारपुस करून कसुन चौकशी केली असता त्यांनीच हा गुन्हा केला आहे आणि यात त्याचा इतर दोन साथीदार आरोपी नामे **२)रोहीत शंकर राजभर वय १९ रा. महाकाली कॉलरी चंद्रपुर, ३) कमलेश दादुभाई गुप्ता वय २२ रा. अष्टभुजा वार्ड चंद्रपुर,** यांचा सहभाग आहे अशी कबुली दिल्याने त्या दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली. सदरच्या गुन्हयात एकुण तीन आरोपीतांना अटक करण्यात आली असुन आरोपीतांकडुन चोरी केलेले एकुण दोन मोबाईल फोन, नगदी रोख असा **एकुण १५,०५०/—रू चा** मुददेमाल हस्तगत केला आहे. पुढिल तपास चंद्रपुर शहर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेशवर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक श्री. एस. एस. भगत, यांचे नेतृत्वात सपोनि. श्री. रहांगडाले, यांचे सह चंद्रपुर शहर गुन्हे शोध पथकातील पोलीस कर्मचारी यांनी पार पाडली.

---

# स्थानिक गुन्हे शाखेची दारू तस्करीवर कार्यवाही
# ४३ लक्ष ३६ हजाराचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक १४/०६/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक मुल परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, काही इमस अवैध दारूची वाहतुक करून मुल मारोडा येथील तलावाजवळ माल उतरवित आहे. अशा माहिती वरून स्थागुशा पथकाने मुल मारोडा तलावाजवळ पोहचुन छापा टाकला असता, तीन चारचाकी वाहन दिसुन आले. सदर वाहनाची संशयावरून झडती घेतली असता वाहनामध्ये देशी दारूच्या २६० पेटया, इंपेरियल ब्ल्यु कंपनीच्या १८ पेटया, हेवडर्स बियर ८ पेटया, एक बोलेरो पिक अप वाहन, आणि दोन मारूती सुजुकी रिट्स असा एकुण ४३ लक्ष ३६ हजाराचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन मुल येथे अप.क्र. ३५८/२०१९ अन्वये नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेशवर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरिक्षक श्री. शेख, यांचे नेतृत्वात सफौ. पद्माकर भोयर, दौलत चालखुरे, पोहवा. महेंद्र भुजाडे, पोशि. कुदंन बावरी, प्रफुल मेश्राम, सतिश, चापोहवा. वामन ढाकणे यांनी पार पाडली.

---